# <u>घोषणा</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमुद केलेल्या पदांच्या मुलाखती संबधीत पदाच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकारोजी आयोगाच्या कुपरेज टेलिफोन निगम इमारत, ८ वा मजला, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई-४०००२१ येथील कार्यालयात आयोजित करण्यात आल्या असून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे व उमेदवारांना sms द्वारे कळविण्यात आले आहे, तसेच मुलाखत पत्र उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. ज्या उमेदवारांना मुलाखत पत्रे प्राप्त होणार नाहीत, अशा उमेदवारांनी ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग कुपरेज, मुंबई-४०००२१ येथील आयोगाच्या मुख्य कार्यालयात संपर्क साधावा. याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|
| ८४/२०१५ | संचालक व्यवसाय शिक्षण /प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ | दिनांक- १२ एप्रिल, २०१८, सकाळी- ९.४५ वा. |
| ५०/२०१७ | विभाग प्रमुख, रसायन अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ | दिनांक- १२ एप्रिल, २०१८, सकाळी- ९.४५ वा. |

उपरोक्त पदाच्या मुलाखतीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळेस आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच उमेदवाराने अर्जात केलेल्या दाव्यानुसार त्यांना मुलाखतीस बोलविण्यात आले आहे. उमेदवारांनी धारण केलेला अनुभव जाहिरातीतील तरतुदीप्रमाणे असणे आवश्यक आहे. याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**महत्वाची टीप** :- उमेदवारांनी शिकविण्याचा दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस विद्यापीठाची अथवा टेक्नीकल बोर्डाची (लागु असेल त्यानुसार) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा तो अनुभव ग्राहय धरता येणार नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक** - २८/०३/२०१८

**सं. पां. देशमुख,**
**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**